जागतिक बँक अर्थसहाय्यीत

मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट)

(गोदाम पावती व्यवस्थेचे बळकटीकरण)

प्रकल्पाचा उद्देश:

- कृषि परिवर्तनाच्या अनुषंगाने कृषि क्षेत्राशी निगडीत संस्थात्मक व्यवस्थेचे बळकटीकरण करणे .
- बाजार संपर्क वाढवून कृषि व्यवसाय वृद्धी करणे.
- शेतमाल बाजार जोखीम निवारणासाठी व्यवस्था निर्माण करणे.

❖ स्मार्ट प्रकल्पाच्या 7 विभागामार्फत 11 प्रकल्प अंमलबजावणी कक्षांची स्थापना. त्यापैकी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत स्मार्ट प्रकल्पाकरिता सहकार विभागाचे प्रतिनिधित्व.

❖ महाराष्ट्र सहकार विकास महामंडळात स्मार्ट प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता " प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- (PIU-MCDC SMART) ची राज्यस्तरावर स्थापना (प्रकल्प कालावधी 2020 ते 2027)

❖ स्मार्ट प्रकल्पामार्फत गोदाम पावती व्यवस्थेचे बळकटीकरण या घटकांतर्गत प्राथमिक कृषी सहकारी संस्थाच्या (PACs)- सभासदांकरीता पर्यायी बाजारपेठेची निर्मिती.

❖ प्रकल्पामार्फत प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या आर्थिक विकासासाठी 35.51 कोटी अनुदानाची तरतूद उपलब्ध.

❖ गोदामाचीं दुरुस्ती व नविन गोदाम उभारणी तसेच स्वच्छता व प्रतवारी सुविधा, कोलॅटरल मॅनेजमेंट संस्थेचे शुल्क प्रकल्पाच्या अनुदानातून देण्याचे नियोजन .

❖ प्रकल्पातून 60% अनुदान तर संस्थेचा 40 % स्वहिस्सा, प्रत्येक सहकारी संस्थेस सुमारे 1 कोटी रुपयांपर्यंत अनुदान

❖ प्राथमिक कृषी सहकारी संस्थांमार्फत गोदाम पावती व्यवसाय सुरू करण्यासाठी कोलॅटरल मॅनेजमेंट कंपनीमार्फत एक वर्ष कालावधीपर्यंत प्रत्यक्ष संस्थेच्या कार्यक्षेत्रातच प्रशिक्षण

❖ प्राथमिक कृषि सहकारी संस्थेच्या सभासदांना गोदाम पावती कर्ज, शेतमालाची सुरक्षा, शेतमालाचे विक्री व्यवस्थापन या सुविधा गावपातळीवर उपलब्ध.

❖ राज्यात 80 प्राथमिक कृषी सहकारी संस्थांना गोदामाचीं दुरुस्ती व 19 प्राथमिक कृषी सहकारी संस्थांना नवीन गोदामे उभारण्याकरिता प्रकल्पांतर्गत सहकार्य.